**भारतीय महाविद्यालय, अमरावती**

# राष्ट्रीय सेवा योजना

**(2016-17)**

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**
**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

---

# नियमित कार्यक्रम अहवाल

**इ. स. 1969 साली महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या विचारांची प्रेरणा केंद्रस्थानी ठेऊन युवकांना समाज व देशकार्यात सहभागी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. राष्ट्रनिर्मांणाची जाणीव विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यात व्हावी व त्यांनी आपल्या कल्पकतेने राष्ट्र उभारणीसाठी हातभार लावावा या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना प्रेरणा देणारी एक चळवळ आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालय अंतर्गत राबविण्यात येते.**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाला 200 (100 मुले + 100 मुली) विद्यार्थ्यांची मान्यता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'Not Me, But You' या ब्रिदवाक्यानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कार्य आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत नियामित कार्यक्रमाच्या व विशेष शिबिराच्या माध्यमातून सतत सुरु आहे.**

**महाविद्यालयात 2016-17 या शैक्षणिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पुढील नियामित कार्यक्रम राबविण्यात आले. त्या सत्रातील नोंदी पुढीलप्रमाणे आहे.**

## 1. वृक्षारोपण: - (महाविद्यालय व दत्तक ग्राम निंभोरा)

भारतीय विद्यामंदीर व्दारा संचालित भारतीय महाविद्यालय राजापेठ, अमरावती येथे **महाविद्यालयाच्या परिसरात व दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली** या ठिकाणी वृक्षलागवडीचा उपक्रम संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या 1 जुलै 2016 रोजी एकाच दिवशी राज्यात किमान 2 कोटी वृक्षलागवडीच्या

महत्वाकांक्षी उपक्रमामध्ये भारतीय महाविद्यालयाच्या वतीने 100 वृक्षाची लागवड करुन मोठ्या उत्साहाने यामध्ये सहभाग घेतला.

भारतीय विद्यामंदीराच्या सरचिटणिस डॉ. आराधना वैद्य, कोषाध्यक्ष डॉ. सतिश कुळकर्णी तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार यांनी वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धना संदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी वृक्षारोपण केले. महाविद्यालयाच्या परिसरात एकुण 40 वृक्षाची लागवड करण्यात आली. वृक्ष लागवड करतांना विविध वृक्ष लावली. यामध्ये कडू लिंब, शिसव, पापडा व कडू बदाम वृक्षाची लागवड केली. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी व कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, प्रा. पंडित काळे, डॉ. आम्रपाली वासनिक यांनी दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली येथे जावून गावक-यांच्या सहकार्याने गावातील मुख्य रस्त्याने व जि. प. शाळेमध्ये एकुण 60 वृक्षाची लागवड करण्यात आली. यामध्ये जि. प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर गिरी व प्राध्यापिका सौ. यादगिरे यांचा सहभाग लाभला. तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे काढण्यात आलेल्या वृक्ष दिंडीमध्ये महाविद्यालयाच्या रा. से. यो. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

## 2. महिला सुरक्षा व कायद्याचे मार्गदर्शन: -

03 ऑगस्ट 2016 रोजी महिलांना सुरक्षेसंदर्भात कायद्याची माहिती मिळावी यासाठी ‘महिला सुरक्षा व कायद्याचे मार्गदर्शन’ या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते. प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय विद्यामंदिराच्या सरचिटणिस डॉ. आराधनाताई वैद्य व स्टाफ सेक्रेटरी डॉ. अलका गायकवाड होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजापेठ पोलीस स्टेशनचे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक माननिय श्री. एस. एम. मानकर** उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना श्री. मानकर साहेब म्हणाले की, जर महिलांनी त्यांच्यावर होणा-या अत्याचार, अन्याय सहन न करता न घाबरता त्याबाबत निर्भीडपणे तक्रार करावी, आम्ही आपणास नक्कीच न्याय देवू असे बोलून महिलांचे मनोधैर्य वाढविले व महिलांच्या बाजूने असणा-या कायदे व तरतूदी बद्दल मार्गदर्शन केले. या प्रसंगी अध्यक्षीय भाषनात प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी कुठल्या तरतुदी आहेत व त्याचा वापर कश्या प्रकारे करायचा याबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाला डॉ. रजनी देशमुख, डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी व डॉ. संध्या कडू आवर्जून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पंडित काळे यांनी केले.

## 3. क्रांतिदिन: -

09 ऑगस्ट 2016 रोजी क्रांतिदिनाचे औचित्य साधून, विद्यार्थी व नागरिकांमध्ये ज्या हुतात्म्यांनी आपल्या देशाला स्वातंत्र मिळविण्यासाठी व क्रांतीच्या आधारे सर्वस्व अर्पण केले अशा क्रांतीविरांची आठवण व जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु व चंद्रशेखर आझाद यांच्या प्रतिमेचे पूजान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार व रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा. नितीन तट्टे, डॉ. अनिल खांडेकर, डॉ. संग्राम रघुवंशी, डॉ. आम्रपाली वासनिक, प्रा. पंडीत काळे उपस्थित होते.

या दिनाचे औचित्य साधुन विद्यार्थी व नागरीकांमध्ये ज्या हुतात्म्यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळण्यासाठी क्रांतीच्या आधारे सर्वस्व अर्पन केले अशा क्रांतीविरांची आठवण व जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांना हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन करता येईल या हेतूने महाविद्यालयासमोरील राजापेठ बडनेरा रस्त्यावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भरपूर लोकांनी सहभाग घेतला व क्रांतिदिनानिमित्य आपली मते विद्यार्थ्यांसमोर मांडली. या सर्व उपक्रमाचे आयोजन रा. से. यो. स्वयंसेवकांनी उत्कृष्ठरित्या केले व सायंकाळी या कार्यक्रमाची सांगता झाली.

## 4. स्वच्छता अभियान: - (महाविद्यालय)

14 ऑगस्ट 2016 रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. स्वच्छतेचे महत्व जाणून घेता साचलेल्या कच-याची व वाढलेल्या गवताची अभियाना अंतर्गत विल्हेवाट लावली. साचलेले पाण्याचे डबके, गांजर गवत, अस्थाव्यस्थ झाडांच्या फांद्या यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर आढळत होती म्हणूनच स्वयंसेवकांनी ही मोहीम हाती घेतली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी स्वयंसेवकांशी हितगुज केली व झालेल्या स्वच्छतेची पाहणी केली.

## 5. पथनाट्यातून जनजागृती: -

15 ऑगस्ट 2016 रोजी स्वातंत्र दिनाच्या पर्वावर ध्वजारोहण नंतर राष्ट्रीय सेवा योजना तर्फे **'आजचा विद्यार्थी व परीवर्तन'** या शिर्षकाखाली पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराचे सरचिटणिस डॉ. आराधना वैद्य, कोषाध्यक्ष डॉ. सतिष कुळकर्णी व एन. सी. सी. अधिकारी डॉ. संग्राम रघुवंशी यांनी प्रमुख

उपस्थिती दर्शवली. **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाईट वागणूक, गुंडगीरी सारखे वर्तन व त्यामधून इतर विद्यार्थ्यांना होणारा त्रास व संस्कृतीचा –हास यातून कसे परीवर्तन** घडून आणता येईल याचे सादरीकरण या नाट्याव्दारे केले. पथनाट्याचे सादरीकरण महाविद्यालयात तसेच राजापेठ चौकात करण्यात आले. पथनाट्याला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे तसेच सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. पथनाट्याचे दिग्दर्शन सुरज जवळकर याने केले. या कार्यक्रमाचे संचालन शुभम हिवराळे याने केले.

## 6. वृक्ष रक्षाबंधन व संवर्धन कार्यक्रम:-

19 ऑगष्ट 2016 रोजी रक्षाबंधनाचे औचित्य साधून 1 जुलै 2016 रोजी महाविद्यालयात लागवड करण्यात आलेल्या वृक्षांचे रक्षाबंधन करण्यात आले. यादिवशी सुरवातीला रा. से. यो. स्वयंसेवकांनी वृक्षांच्या आजू बाजूचे गवत काढून व वृक्षांना वाफे तयार करुन त्यांना पाणि घालण्यात आले. त्यानंतर वृक्ष संवर्धनासाठी तीन स्वयंसेवकांना प्रत्येकी एक वृक्ष दत्तक देण्यात आले व त्यांच्या मार्फत वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. जे ने करुन विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष संवर्धनाचे महत्व लक्षात येईल. त्याच बरोबर महाविद्यालयातील बागेची सुध्दा स्वच्छता करण्यात आली. या सर्व उपक्रमाचे आयोजन रा. से. यो. स्वयंसेवकांनी उत्कृष्ठरित्या केले.

## 7. अपघातग्रस्त गरीब विद्यार्थ्याला आर्थिक मदत: -

25 ऑगस्ट 2016 रोजी अपघातग्रस्त सोहम चंद्रदिप डांगे (वय – 8 वर्ष) या निराधार विद्यार्थ्याला 15,000/- रु. ची आर्थिक मदत महाविद्यालयातील रा. से. यो. विभागातर्फे करण्यात आली. ही रक्कम रा. से. यो. पथकातील स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनकडून व प्राध्यापकांनकडून 15 ते 25 ऑगस्ट 2016 या कालावधीत गोळा करुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार व कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू यांच्या हस्ते अपघातग्रस्त विद्यार्थ्याच्या आईला देण्यात आली.

अपघातग्रस्त सोहम चंद्रदिप डांगे हा जळू ता. नांदगाव खंडेश्वर गावचा असुन अमरावतीला कामानिमित्य येत असतांना त्याचा व त्याच्या वडीलांचा जळू फाट्यावर अनियंत्रीत ट्रकच्या धडकेने अपघात झाला. अपघातादरम्यान त्याच्या वडीलाचा जागीच मृत्यु झाला व सोहमच्या डोक्याला जबर मार लागला. 15 दिवस तो सुपर स्पेशालीटी रेडियंट हॉस्पीटल अमरावती येथे बेशुध्द अवस्थेत होता. पण परिस्थिती हालाकीची

असल्यामुळे त्याच्या उपचारासाठी त्याच्या आईजवळ पैसा नव्हता. नातेवाईकांनकडून व इतरांनकडून मदत मिळत नव्हती. हा सर्व प्रकार त्या हॉस्पीटलमध्ये कामावर असणा-या आमच्या महाविद्यालयातील रा. से. यो. स्वयंसेवक हर्षल धांडे याच्या लक्षात आला व त्याने प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांची परवानगी घेवून इतर स्वयंसेवकांच्या साह्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनकडून व प्राध्यापकांनकडून पैसे गोळा करण्यास सुरुवात केली व आर्थिक मदत म्हणून अपघातग्रस्त सोहमच्या आईला देण्यात आली. या आर्थिक मदतीचा एका निराधार कुटूंबाला फायदा झाला.

## राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह

### 8. नागरिकांचे मुलभूत अधिकार: -

24 सप्टेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचे औचित्य साधून "नागरिकांचे मुलभूत अधिकार" या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू होते तर प्रमुख वक्ते म्हणून **ॲड. कु. वैशाली कोरे** लाभल्या.

या कार्यक्रमासाठी लाभलेल्या प्रमुख मार्गदर्शिका ॲड. कु. वैशाली कोरे यांनी नागरिकांचे मुलभूत अधिकार कोणते? व त्यांचे कर्तव्य याबद्दल कायदेविषयक सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. तसेच अधिकारांचा वापर कसा केला पाहिजे, त्याच्या मर्यादा कुठल्या यावर सुध्दा त्यांनी प्रकाश टाकला व शेवटी त्यांनी अधिकार आणि कर्तव्य यातील फरक सुध्दा स्पष्ट केला. या कार्यक्रमाचे संचालन कु. अश्विनी माहोरे हीने केले व आभार प्रदर्शन कु. प्रिया गुल्हाने हीने मानले.

### 9. रस्ता सुरक्षा अभियान: -

26 सप्टेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचे औचित्य साधून **'रस्ता सुरक्षा अभियान'** राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनमध्ये व जनतेमध्ये वाहतुक संबंधी जनजागृती निर्माण व्हावी या दृष्टीकोणातून **'वाहतुक नियंत्रण जनजागृती'** फलकाचे अनावरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी भारतीय विद्यामंदिराचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. सतिष कुळकर्णी व प्रा. डॉ. सुभाष गवई उपस्थिती होते.

त्यानंतर 'वाहतुक नियंत्रण जनजागृती' पत्रक महाविद्यालयासमोरील बडनेरा रोडवर व राजापेठ चौकात येणा-या जाणा-या वाहन चालकांना व पदचा-यांना रा. से. यो. स्वयंसेवकांनी वितरीत केले. कार्यक्रमाला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली

वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी रा. से. यो. स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## 10. आरोग्य तपासणी शिबीर: -

27 सप्टेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थींनीसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जायका इन्शुरन्स अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. शिबीरामध्ये **Blood Group Test, Hemoglobin Test, Sugar Test, Blood Pressure** तपासण्यात आले. या शिबीराच्या उद्घाटण प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार लाभले तर जायका इन्शुरन्सचे असिस्टंट मॅनेजर श्री. प्रशांत लंगोटे व शिराज शेख यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली.

आरोग्य तपासणीसाठी वोक् हार्ट हॉस्पीटल नागपूरचे डॉ. अक्षय ठाकरे व त्यांची चमू यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या चामूंनी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या Blood Group Test, Hemoglobin Test, Sugar Test, Blood Pressure तपासणी करुन दिल्या व डॉ. अक्षय ठाकरे यांनी निदान करुन त्यावर उपचाराचा सल्ला दिला. या शिबीरात एकून **92 विद्यार्थ्यांची** आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबीराला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आम्रपाली वासनिक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे उपस्थित होते.

## 11. पशु रोग निदान व लसिकरण शिबीर:- (दत्तक ग्राम निंभोरा)

28 सप्टेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली येथे पशु रोग निदान व लसिकरण शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीरासाठी **पशु वैद्यकिय दवाखाना, भातकुली येथील डॉ. इजापूरे व डॉ. सवई** यांनी दत्तक गावातील पाळीव जनावरे (बैल, गाय, म्हैस, बकरी इ.) यांचे **लसिकरण** करुन दिले व रोग निदान करुन **मोफत औषधी** वाटप केली. एकूण **117 जनावरांची** रोग निदान चिकित्सा या शिबीरात करण्यात आली.

या शिबीराला गावातील पोलीस पाटील श्री. सुभाष यादगिरे, प्रा. रावसाहेब यादगिरे यांचे सहकार्य लाभले तसेच रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे उपस्थित होते. या शिबीरासाठी रा. से. यो. स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## 12. प्लास्टीक निर्मुलन अभियान:- (कापडी पिशवी वाटप)

29 सप्टेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने प्लास्टीक पिशवी निर्मुलन अभियान राबविण्यात आले. प्रत्येक स्वयंसेवकाने स्व:ताची एक कापडी पिशवी तयार करुन आणून प्लास्टीक पिशवीचा वापर करणा-या लोकांना वाटप करणे जे ने करुन जनतेसमोर पर्यावरण समतोल राखण्याचा संदेश जाईल हा या अभियाना मागचा उद्देश.

या कार्यक्रमाला भारतीय विद्यामंदीराचे कोषाध्यक्ष डॉ. सतीश कुळकर्णी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार उपस्थित होते. स्वयंसेवकांनी राजापेठ चौकातील भाजीबाजार व फळबाजाराच्या दुकानासमोर उभे राहून भाजीपाला व फळे घेणा-या लोकांना प्लास्टीक पिशवी ऐवजी कापडी पिशवी वाटप केल्या व प्लास्टीक पिशव्या टाळण्याचा संदेश दिला. या अभियाना अंतर्गत एकूण 200 कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या सर्व उपक्रमाला प्राणिशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले व प्लास्टीक पिशवी निर्मुलन अभियान यशस्वी करण्यासाठी स्वयंसेवकांनी अती परीश्रम घेतले.

## 13. गाजर गवत निर्मुलन अभियान:-

01 आक्टोबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सभेचे व सप्ताहचे औचित्य साधून महाविद्यालयात गाजर गवत निर्मूलन अभियान राबविण्यात आले. रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. स्वच्छतेचे महत्व जाणून घेता साचलेल्या कच-याची व वाढलेल्या गाजर गवताची अभियाना अंतर्गत विल्हेवाट लावली. साचलेले पाण्याचे डबके, गाजर गवत, अस्थाव्यस्थ झाडांच्या फांद्या यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर आढळत होती म्हणूनच स्वयंसेवकांनी ही मोहीम हाती घेतली. या अभियानाला **प्रा. नितीन तट्टे** यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांनी स्वयंसेवकांशी हितगुज केली व झालेल्या स्वच्छतेची पाहणी केली.

## 14. महात्मा गांधी जयंती: -

02 ऑक्टोबर 2014 रोजी ‘म. गांधी जयंती’ व रा. से. यो. सप्ताह समारोप निमित्य “महात्मा गांधीजींचे विचार” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला वक्त्या म्हणून **रा. से. यो. माजी विद्यार्थिनी कु. रश्मी जिवतोळे व कु. श्रध्दा ढोके** लाभल्या व कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रा. निलेश कडू (कार्यक्रम अधिकारी रा. से. यो.) यांनी भुषविले.

महात्मा गांधीजींचे राष्ट्र निर्मितीसाठीचे विचार व त्यांच्या विचारांची प्रेरणा ठेऊन युवकांनी समाज व देशकार्यात कसे सहभागी व्हावे व राष्ट्रीय सेवा योजनेचे त्यासाठीचे महत्व कु. रश्मी जिवतोळे हिने आपल्या भाषनातून मांडले. तसेच राष्ट्रनिर्माणाची जाणीव विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यात व्हावी व त्यांनी आपल्या कल्पकतेने राष्ट्र उभारणीसाठी हातभार लावावा या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना प्रेरणा देणारी एक चळवळ आहे याबद्दलची माहिती कु. श्रध्दा ढोके हिने दिली. तसेच आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. निलेश कडू यांनी महात्मा गांधीजींच्या जिवन चरीत्र्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन कु. मनिषा अडसोड हिने केले तर आभार अमित मोहोड याने मानले.

## 15. शहीद दिन: -

21 आक्टोबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना शहिद दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून आमच्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी शहीद सुनिल शंकरराव कांबळे यांना श्रध्दांजली देण्यात आली. या कार्यक्रमासाठी राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. के. एम. पुंडकर व कॅप्टन राकेश कुमार यादव उपस्थीत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार यांनी भुषविले. या कार्यक्रमामध्ये शहीद सुनिल शंकरराव कांबळे यांच्या आई सौ. लिलाबाई कांबळे यांचा सत्कार शाल व श्रीफळ देवून प्राचार्य डॉ. अनिल गादेवार यांच्या हस्ते करण्यात आला.

शहीद सुनिल शंकरराव कांबळे 19 बटालियन BSF, रेजीमेंट क्र. 89009279 यांना सापोर काश्मीर येथे दि. 07 आक्टो. 1993 रोजी आतंकवादी हल्ल्यात आपले कर्तव्य बजावतांना वीरमरण प्राप्त झाले. या कार्यक्रमाचे संचालन रामकृष्ण धाये याने केले.

## 16. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन : -

22 आक्टोबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सभेच्या निमित्याने महाविद्यालयात 'वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, जेष्ठ नागरीक श्री. बाळूभाऊ पिसाळ व महाविद्यालयातील कर्मचारी श्री. रवी ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. स्वयंसेवकांनी खड्डे खोदूम वृक्षारोपण केले व वृक्ष संवर्धनाचे महत्व पटवून घेतले. वृक्षारोपणामध्ये कडूबदाम, निंब व निलगिरी या झाडांचा वापर करण्यात आला.

## 17. एड्स जनजागृती व उद्बोधन: -

01 डिसेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे एड्स जनजागृती व उद्बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून **डॉ. तृप्ती जवादे व सौ. वृषाली मोहोड** (अपेक्षा होमियो सोसायटी NGO) लाभल्या. तसेच कार्यक्रमासाठी डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी यांनी प्रमुख उपस्थीती दर्शविली.

डॉ. तृप्ती जवादे यांनी आपल्या भाषनामध्ये एड्स रोग होण्याची कारणे, तो रोग टाळण्यासाठी त्यावर उपाय योजना, त्या रोगाची दक्षता कशी घ्यावी व लोकांमध्ये त्याची जनजागृती कशी कारावी यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

## 18. रक्तदान शिबिर: -

09 डिसेंबर 2016 रोजी राष्ट्रीय सेवा योजना व एच. डी. एफ. सी. बँक, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीराचे उद् घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी एच. डी. एफ. सी. बँक चे रीजनल ऑफिसर श्री. पंकज भैया उपस्थीत होते. रक्तदान शिबीरास संत गाडगे बाबा ब्लड बँक, अमरावतीचे डॉ. जोशी व त्यांचे चमू यांचे सहकार्य लाभले.

या शिबिरामध्ये **एकूण 50** महाविद्यालयीन विद्यार्थींनी रक्तदानाचा हक्क बजावला व रक्तदात्यांना चहा, बिस्कीट व नास्ता देऊन एच. डी. एफ. सी. बँकेतर्फे बक्षीसे देण्यात आली. रक्तदान शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, प्रा. आम्रपाली वासनिक, प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी केले.

## 19. सांस्कृतीक कार्यक्रमातून जनजागृती: -

26 जानेवारी 2017 रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पर्वावर ध्वजारोहण नंतर राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये ज्वलंत समस्यांनवर विवीध पथनाट्य व देशभक्तीपर नृत्य आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद् घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार व भारतीय विद्यामंदीराचे सरचिटणीस डॉ. सतीश कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच NCC अधिकारी डॉ. संग्राम रघुवंशी, डॉ. मंगला भाटे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने

माननिय श्री. अन्नाजी यादगिरे जेष्ठ नागरीक दत्तक ग्राम निंभोरा यांचा सत्कार शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन प्राचार्य डॉ. अनिल गादेवार यांच्या हस्ते करण्यात आला.

त्यानंतर रा. से. यो. स्वयंसेवकांनी देशभक्तीपर नृत्य 'मिले सुर मेरा तुम्हारा.........' व 'देश रंगीला..........' सादर केले. तसेच ज्वलंत समस्यांनवर जसे की, 'स्वच्छ भारत अभियान' 'कॅशलेस जनजागृती' 'अंधश्रध्दा निर्मूलन' 'सैनिक' व 'माझ्या स्वप्नातील भारत' या शिर्षकाखाली नाटकाच्या स्वरुपात जनजागृती करण्यात आली. पथनाट्याला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभम हिवराळे याने केले तर आभार रामकृष्ण धाये याने मानले व कार्यक्रमाचा शेवट एन. सी. सी. गीताने झाला.

**डॉ. ए. जे. गादेवार**
**प्राचार्य**

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**

**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

**प्रा. पंडीत काळे**
**सहकार्यक्रम अधिकारी**

**प्रा. गायत्री चवाळे**
**सहमहिला कार्यक्रम अधिकारी**